INDIA PARTNER Dabur GROUP

AVIVA
Life Insurance

# अविवा जन सुरक्षा



## अविवा जन सुरक्षा - व्यक्तिगत, नॉन-लिंक्ड असहभागी शुद्ध जोखीम जीवन विमा योजना

जीवन हे अनिश्चिततेने पूर्ण भरलेले आहे आणि तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तींचे भविष्य सुरक्षित करण्याची गरज आहे. तुमच्या बाबतीत काही दुर्दैवी घटना घडली तर तुमच्या मुलांची काळजी कोण घेईल, मुलांचे शिक्षण/विवाह यासाठी कोठून पैसा येईल, आणि तुम्ही काही कर्ज घेतले असेल तर ते कोण फेडेल?

जन सुरक्षा ही जीवन विमा योजना आहे जी तुम्हाला तुमच्या मुलांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करते. एखादा जीव गेल्यास ते नुकसान भरुन काढता येणारे नसते, परंतु काही बाबतीत दुर्दैवी घटना घडल्यास, जन सुरक्षा त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण होतील याची काळजी घेते.

### याची उद्दिष्टे

- तुमच्या दुर्दैवी मृत्यूच्या जोखमीपासून तुमच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना आर्थिक संरक्षण देणे.

### अविवा जन सुरक्षा काय आहे?

- अविवा जन सुरक्षा ही कमी खर्चाची जीवन विमा योजना आहे जी पॉलिसीच्या कालावधीत तुमचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास ठोस रक्कम देण्याची खात्री देते. तुम्हाला नियमित हप्ता भरणा किंवा एकेरी हप्ता भरणा यातून निवड करण्याचा अधिकार आहे.
- 18 ते 45 वर्ष वयोगटातील कोणाही व्यक्तीच्या जीवनासाठी अविवा जन सुरक्षा खरेदी करता येते. ही पॉलिसी एकतर 5 वर्ष किंवा 10 वर्षांच्या मुदतीसाठी खरेदी करता येते आणि पॉलिसीची मुदत संपण्याच्या वेळी विमित व्यक्तीचे कमाल वय 50 वर्ष किंवा 55 वर्ष अनुक्रमे असते.
- किमान विमा रक्कम ₹30,000 नियमित हप्त्यासाठी आणि ₹25,000 एकेरी हप्त्यासाठी ते जास्तीत जास्त ₹50,000 अशा कितीही रकमेची अविवा जन सुरक्षा खरेदी करता येते, जे मंडळाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या पॉलिसीच्या कराराच्या अधीन असेल.
- किमान व कमाल वार्षिकीकृत/एकेरी हप्ता किमान व कमाल विमा रकमेवर अवलंबून असेल.

### ह्या योजनेचे फायदे काय आहेत?

- पॉलिसीच्या मुदतीत दुर्दैवी मृत्यू झाल्यास, तुमच्या नामनिर्देशित व्यक्तीला विमा रक्कम दिली जाते. अपघाती मृत्यू झाल्यास, तुमच्या नामनिर्देशित व्यक्तीला दुप्पट विमा रक्कम दिली जाते.
- तुम्हाला कोणत्याही वैद्यकीय चाचण्या करून घेण्याची आवश्यकता नाही.
- तुम्ही भरलेले हप्ते आयकर कायदा, 1961 मधील कलम 80C अन्वये कर वजावटीस पात्र आहेत. सरकारी अधिसूचनेनुसार कर कायद्यात वेळोवेळी बदल होऊ शकतात.

## उदाहरण

हे उदाहरण ₹30,000 इतक्या हमी रकमेसाठी आहे.

| हप्त्याची वारंवारिता | पॉलिसीची मुदत (वर्ष) | हप्ता (₹) वयोगटासाठी | | |
|---|---|---|---|---|
| | | 18 – 35 | 36 – 40 | 41 - 45 |
| वार्षिकीकृत हप्ता | 5 | 210 | 236 | 270 |
| | 10 | 210 | 236 | 270 |
| एकेरी हप्ता | 5 | 780 | 900 | 1050 |
| | 10 | 1260 | 1560 | 1920 |

''वार्षिकीकृत हप्ता'' म्हणजे कर, रायडर हप्ते, करारांनुसार अधिक हप्ते आणि मोडल हप्तेसाठी लोडिंग्स, काही असल्यास ते वगळता पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय असलेली हप्ताची रक्कम आहे.

''एकेरी हप्ता'' ही  कर, रायडर हप्ते आणि विम्याची अधिक हप्ता, काही असल्यास, ते वगळता हप्त्याची रक्कम असेल.

## अधिक माहिती

- सवलत कालावधी

  ''सवलत कालावधी'' म्हणजे कंपनीद्वारा कोणताही दंड न होता किंवा विलंब शुल्क न भरावे लागता, हप्ता भरण्यासाठी देय तारखेपासून दिलेला कालावधी, ज्या दरम्यान पॉलिसीच्या नियम व अटींनुसार कोणताही खंड न पडता जोखीम संरक्षणासह पॉलिसी कार्यान्वित असल्याचे समजले जाते. हप्ता भरण्यासाठी सवलत कालावधी वार्षिक, सहामाही व तिमाही पद्धतीसाठी 30 दिवस आणि मासिक हप्ता भरणा पद्धतीसाठी 15 दिवस असेल.
- हे शुद्ध मुदत विमा उत्पादन आहे, त्यामुळे परिपक्वतेला कोणतेही लाभ देय नसतील.
- तुम्ही रोख रकमेच्या स्वरूपात, धनादेशाने किंवा डिमांड ड्राफ्टने हप्ता भरू शकता.

## पुनरुज्जीवन

रद्द झालेली पॉलिसी पुनरुज्जीवित करता येते परंतु 5 वर्षांच्या कालावधीत पॉलिसीच्या मुदतीत, पहिल्या न भरलेल्या हप्त्याच्या तारखेपासून 5 वर्षांच्या आत म्हणजे पुनरुज्जीवन कालावधीत, रद्द झालेली पॉलिसी  पुनरुज्जीवित करता येते. त्यासाठी कंपनीच्या विद्यमान मंडळाने मंजूर केलेल्या कराराधीन पॉलिसी अंतर्गत, कंपनीचे समाधान होईल अशा प्रकारे निरंतर विमायोग्यतेचे पुरावे सादर करावे लागतील व ते पुनरुज्जीवित करण्याची रक्कम आणि सर्व न भरलेल्या हप्त्यांचे पैसे भरण्याच्या अधीन असेल. कंपनी विद्यमान मंडळाने मंजूर केलेल्या कराराधीन पॉलिसी अंतर्गत रद्द झालेली पॉलिसी पुनरुज्जीवित करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

## वजावट

पॉलिसी अंतर्गत जोखीम सुरु झाल्याच्या तारखेपासून किंवा पॉलिसीच्या पुनरुज्जीवनाच्या तारखेपासून 12 महिन्यांचे आत, लागू असेल त्याप्रमाणे, विमित व्यक्तीचा आत्महत्येद्वारे मृत्यू झाल्यास, पॉलिसी कार्यान्वित असल्यास, पॉलिसीधारकाची नामनिर्देशित व्यक्ती किंवा लाभधारक हे मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या हप्ताच्या किमान 80% किंवा मृत्यूच्या तारखेला उपलब्ध असलेले सरंडर मूल्य, ह्यापैकी जे अधिक असेल तितकी रक्कम मिळण्यास पात्र असेल.

## मोफत पाहणी कालावधी:

तुम्हाला पॉलिसीचे दस्तऐवज मिळाल्यापासून 15 दिवसांचे आत पॉलिसीचे नियम व अटी यांचा आढावा घेण्याचा आणि पॉलिसी परत करण्याचा अधिकार आहे. तुम्ही तुमची पॉलिसी परत केल्यास, मुद्रांक शुल्क समायोजित करून तुम्ही भरलेले हप्त्याचे पैसे तुम्हाला परत करण्यात येतील.

## स्वीकृती

जोखीम आणि हप्ताची रक्कम स्वीकारल्याशिवाय अविवा कोणत्याही दाव्यास जबाबदार नसेल.

## अविवामध्ये गुंतवणूक का करावी?

अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड ही डाबर इन्व्हेस्ट कॉर्पोरेशन आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड - यूके तील विमा कंपनी यांचा संयुक्त उपक्रम आहे ज्यांचा भारताशी 1834 पासून संबंध आहे. अविवा लाईफ इन्शूरन्सची निवड केल्यास तुम्हाला जगातील एका सर्वाधिक जुन्या विमा समुहाचा व्यवस्थापनाच्या अनुभवाचा लाभ मिळतो ज्यांना 1696 पासूनचा इतिहास आहे. अविवापाशी 16 बाजारपेठांमध्ये 33 दशलक्ष ग्राहक आहेत.

1884 साली स्थापन करण्यात आलेली डाबर इंडिया लिमिटेड, ही डाबर समुहाची प्रमुख कंपनी असून ती भारतातील सर्वाधिक जुन्या आणि मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. ही देशातील एक अग्रणी पारंपारिक आरोग्यसेवा उत्पादने बनविणारी कंपनी आहे.

**ह्या पॉलिसी अंतर्गत नेमणुका** आणि नामांकन, यास विमा कायदा, 1938 मधील कलम 38 आणि 39, वेळोवेळी सुधारित, अन्वये परवानगी आहे.

## कलम 41

विमा कायदा, 1938 मधील कलम 41 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे (1) कोणीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्याच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरु ठेवण्यासाठी कोणाही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हप्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरु ठेवणारी कोणीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही.

(1) जर एखाद्या विमा एजंटने त्याच्या स्वत:च्या जीवनावर स्वत: जीवन विमा पॉलिसी घेण्याच्या संदर्भात कमिशनचा स्वीकार केला तर तो ह्या उपकलमाच्या अर्थाच्या अंतर्गत हप्तामध्ये सूट स्वकारले असे गृहित धरले जाणार नाही जर अशा प्रकारे स्वीकारताना विमा एजंटाने तो विमा कंपनीने नेमणुक केलेला अधिकृत विमा एजंट आहे असे सिद्ध करणाऱ्या विहित अटींची पूर्तता केली पाहिजे.

(2) ह्या कलमाच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत कोणाही व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, दंड आकारला जाईल जो रु. दहा लाख पर्यंत वाढविला जाऊ शकतो.

## कलम 45

विमा कायदा, 1938 मधील कलम 45, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, 3 वर्षांनंतर चुकीच्या विधानासाठी पॉलिसीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करता येणार नाही.

## प्रश्न व तक्रारी

तुम्हाला अधिक माहिती हवी असल्यास किंवा काही चौकशी किंवा तक्रार करायची असल्यास, कृपया मागे देण्यात आलेल्या क्रमांकांवर आमच्याशी संपर्क साधा.

AVIVA
| Life Insurance |

*डाबर इन्व्हेस्ट कॉर्पो. आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम*

**अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड**

**मुख्य कार्यालय:** अविवा टॉवर, सेक्टर रोड, गोल्फ कोर्ससमोर, DLF फेज-V, सेक्टर 43, गुरगाव-122003, हरयाणा, भारत.
फोन क्र.: +91 124-2709000, फॅक्स क्र.: +91 124-2571210, वेबसाईट: www.avivaindia.com, ई-मेल: customerservices@avivaindia.com

**नोंदणीकृत कार्यालय:** 2रा मजला, प्रकाशदीप बिल्डिंग, 7, टॉल्स्टॉय मार्ग, नवी दिल्ली-110001, भारत.

खोटे फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा IRDA द्वारा जनतेस स्पष्टिकरण देण्यात आहे की :

- IRDA किंवा त्यांचे अधिकारी कोणतीही विमा किंवा आर्थिक उत्पादनांच्या विक्रीत सहभागी होत नाहीत किंवा हप्त्याची गुंतवणूक करत नाहीत.
- IRDA द्वारा कोणत्याही प्रकारच्या बोनसची घोषणा करण्यात येत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस दूरध्वनी क्रमांकाचा तपशिल, क्रमांक अशा माहितीच्या तपशिलासह त्या संबंधात पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अविवा जन सुरक्षा - व्यक्तिगत, नॉन-लिंक्ड असभागी शुद्ध जोखीम जीवन विमा योजना. वर प्रदर्शित करण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अविवा ब्रँडस लिमिटेड यांचे आहेत आणि अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड द्वारा त्यांचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. करलाभ हे विद्यमान करकायद्यांनुसार आहे ज्यात बदल होऊ शकतात. UIN: 122N021V02, MKT/December 2015/Ver. 1.4, Advt. No.: Sep 34/19.